## नि. ८९ वरील आदेश

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमीशनरचे नेमणूकीसाठी केलेला आहे.

२. वादीचे कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा हा गट नं. ९४/४ या मिळकतीपैकी प्रतिवादी क्र. ८ कडून खरेदी घेतलेल्या ०.४० आर मिळकतीस प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी हरकत अडथळा करू नये व गट नं. ९४/४ या मिळकतीपैकी ०.४० आर मिळकतीची व पोट हिश्याची टी.आय.एल.आर. मार्फत मोजणी होवून मोजणीच्या हद्दी व खुणा निश्चीत करून अतिक्रमीत क्षेत्र परत मिळण्यासाठी केला आहे. सदर दाव्यामध्ये टी.आय.एल.आर. संगमनेर यांची नेमणूक होवून दावा मिळकत गट नं. ९४/४ या मिळकतीची फाळणी पाटी करून वादीच्या हिश्याची मोजणी करून मोजणीच्या हद्दी निश्चीत होवून तसा मोजणीचा नकाशा तयार करून प्रतिवादींनी अतिक्रमित केलेले क्षेत्र परत मिळण्यासाठी सदरचा अर्ज.

३. प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांनी नि. ९२ वर म्हणणे व कैफियत दिली आहे. दि. १५.१०.२००७ रोजी पोलिसांनी वादीचे पोलिस मदतीचे मा. न्यायालयाचे हुकूमावरून पोलिस मदत देताना दिलेल्या अहवालावरून आजही गट नं. ९४/४ मधील ०.४० आर मिळकत वादीचे ताब्यात नाही हे स्पष्टपणे दिसुन येते. तसेच वादीने पोलिसांकडे मला ताबा द्या अशी मागणी केल्याचे देखील स्पष्टपणे दिसुन येते. वादीने प्रतिवादी क्र. ८ व त्याच्या मुलांना हाताशी धरून प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांना जाणीवपुर्वक त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. म्हणून सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखांवरील कागदपत्रांची पडताळणी केली. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या अस्तित्वाबद्दल वाद आहेत. अशा परिस्थितीत दावा मिळकतीची मोजणी झाल्यास प्रतिवादींचे काहीही एक नुकसान होणार नाही. याउलट दावा मिळकतीची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार आहे व पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी सदर अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. म्हणून खालील आदेश.

**आ दे श**

१ अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२ तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात येत आहे.

३ कोर्ट कमिशनर यांना असे आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी मौजे साकुर, ता. संगमनेर येथील गट नं. ९४/४ या मिळकतीची मोजणी करून हद्दी निश्चीत कराव्यात तसेच जर अतिक्रमण असेल तर त्याबाबतचा नकाशा तयार करावा व कोणाच्या कब्जामध्ये कोणते क्षेत्र आहे याचा खुलासा दयावा.

४ वादी व प्रतिवादी यांनी कोर्ट कमिशनरला आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर करावी.

५ वादीने कोर्ट कमीशनरची नियमाप्रमाणे होणारी फी कार्यालयात भरावी.

६ कोर्ट कमीशनर यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी त्यांचा कोर्ट कमीशनर बाबतचा रिपोर्ट ३०/०१/२०१६ पावेतो दाखल करावा.

७ कोर्ट कमिशनचे पत्र पाठविण्यात यावे.

(सं. क. कारंडे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
संगमनेर.

दि. ०४/०१/२०१६.